अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.२९/२०२४
जा.क्र उआ(मा.प्र.)/ आस्था/३८१ दि.१२/४/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(मा.प्र.)/अपिल/२९/२०२४

प्रति,
श्री.अविनाश रामचंद्र रिठे,
रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डींग जाधववस्ती
कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५

यांस
---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
---------------- प्रतिवादी

श्री.अविनाश रामचंद्र रिठे, रा.रिठे हाऊस, डावखरे बिल्डींग जाधववस्ती कळसगाव, आळंदी मार्ग, पुणे-४११०१५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.स्वागत/ १३१०३ दि.२३/२/२०२४ (आ.क्र.२०३२७ दि.२३/२/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/१२९५५ दि.०४/०३/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २३/२/२०२४ | २३/२/२०२४ | २२/३/२०२४ | ०४/०३/२०२४ | ० |

माहिती दिली नाही म्हणून श्री.अविनाश रिठे महापालिका आयुक्त कार्या, पुणे महानगरपालिका जा.क्र.स्वागत/१३१५२ दि.२७/२/२०२४ (आ.क्र.२०५७९ दि.२८/२/२०२४) रोजी श्री.अविनाश रिठे यांचेकडून अपिल अर्ज प्राप्त झाला आहे.

२९ ५

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २७/२/२०२४ | २८/२/२०२४ | ०३/४/२०२४ | होय | -- |

अपिल अर्जाचे अनुषंगाने जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/ १३३७६ दि.१४/३/२०२४ रोजी दि.१९/३/२०२३ रोजी दुपारी १२.४५ वा. ऑनलाईन सुनावणी आयोजित करणेबाबत कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. मात्र जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे हक्काच्या रजेवर असल्याने अनुपस्थित होते.

## विवेचन

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.स्वागत/ १३१०३ दि.२३/२/२०२४ (आ.क्र.२०३२७ दि.२३/२/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. मूळ अर्जामध्ये दि.११/११/२०२३ ते २०/१/२०२४ श्री.एस.एस.देशपांडे, अति.मुख्य सचिव यांचेकडे श्रीमती इंद्रायणी करचे यांचे विरुद्ध केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाईचा तपशील मिळणेबाबी अर्ज दाखल केला आहे. तक्रारीचे अनुषंगाने तक्रार अर्ज जा.क्र.उआ(सा.प्र)/८८३८ दि.२२/११/२०२३ रोजी उप आयुक्त (परिमंडळ क्र.१) यांचेकडे अहवाल सादर करणेबाबत पत्र देण्यात आले होते. श्री.रिठे यांच्या तक्रारीचे अनुषंगाने श्रीमती इंद्रायणी करचे यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. श्रीमती करचे यांचा अहवाल मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचेकडे सादर केलेले अभिलेख व मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाबाबत कागदपत्रे देण्यात आली आहेत. सदर माहिती जा.क्र.जमाअ/आस्था/१२९५५ दि.०४/०३/२०२४ रोजी अपिलार्थी' यांना दिले असल्याचे अभिलेख्यांवरून निदर्शनास येत आहे.

श्री.अविनाश रिठे यांनी दि.९/३/२०२४ (आ.क्र.२१ ४६ दि.१३/३/२०२४ व २१९५१ दि.१८/३/२०२४ ) रोजी सुनावणीचे अनुषंगाने लेखी म्हणणे प्राप्त झाले आहे. त्यातील संक्षिप्त मुद्दे पुढीलप्रमाणे:-

१. जन माहिती अधिकारी यांचेकडून चुकीची माहिती देण्यात आली आहे.
२. माहिती हेतूपुरस्सर माहितीचा अधिकार अन्वये चुकीचे अवलोकन करुन माहितीपत्र दिले आहे.
३. मे.शासन निर्णय दि.२४/२/२०२४ व दि.२०/१/२०२४ रोजी दाखल माहितीचा अधिकार अन्वये अर्ज व अपलल यास लागू पडत नाही.
४. श्रीमती करचे यांनी पालखी सोहळयातील सुशोभीकरणाच्या कामाबाबत माहिती मागविण्यात आली आहे व्यक्तिगत माहिती मागितली नाही.
५. सदर तक्रार विलंबास प्रतिबंध, महाराष्ट्र अधिनियम अंतर्गत तक्रारावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.
६. श्री.एस.एस.देशपांडे, अतिरिक्त मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सादर तक्रारीवर कार्यवाही चुकीची केली असून योग्य माहिती देण्याचे टाळण्यात आले आहे.
७. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दाखल अर्जातील माहिती देऊ करावी.

श्रीमती इंद्रायणी करचे यांचेविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६(फ) नुसार, महाराष्ट्र विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ नुसार कारवाई होणे अपेक्षित असताना माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार कारवाई करण्यात आली आहे असे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

श्रीमती करचे यांच्याबाबत दि.११/११/२०२३ रोजी श्रीमती करचे या येरवडा-कळस धानोरी क्षे.कार्यालयाकडे कार्यरत असताना पालखी मोहळयामध्ये पालखी विसावा तळ सुशोभिकरणबाबत तक्रार दाखल केली आहे. श्रीमती करचे यांचा त्या अनुषंगाने खुलासा प्राप्त होवून मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचेकडे खुलासा सादर करण्यात आला असून प्रशासकीय कारवाई पूर्ण करण्यात आली आहे. शासन परिपत्रक दि.१७/१०/२०१४ चे परिपत्रकानुसार माहिती देण्यात आली नसल्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपिलार्थी यांचे सुनावणी दरम्यानचे विवेचन, उपलब्ध माहिती व उपरोक्त विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

शासन परिपत्रक दि.१७/१०/२०१४ नुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापन, कारणे दाखवा नोटिस, शिक्षादेश त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल, त्याच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती त्याने केलेली आर्थिक गुंतवणूक वा बँक किंवा अन्य वित्तीय संस्थाकडून घेतलेली कर्ज इ.बाबतची माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नसल्याची तरतूद आहे. सबब, श्रीमती इंद्रायणी करचे यांचेवर केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेखे देणेबाबत मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांना पत्र देवून मार्गदर्शन मागविण्यात यावे. मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.०९/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे. नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.